| MHKO100011032022 | **नियमीत दिवाणी दावा क्र. २४८/२०२२** |
|---|---|
| | भिमाप्पा व्हनुरी (जंगली) वगैरे.<br>//वि//<br>हौसाबाई जंगली वगैरे. |

**निशाणी क्र.२५ वर आदेश**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ३, ९, ११ व १२ यांनी त्यांचेविरुध्द झालेला "एकतर्फा" चा आदेश रद्द करुन मिळणेकरीता दाखल केलेला आहे. वादीतर्फे सदर अर्जाचे मागील पानावर म्हणणे दाखल केले. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

०२. प्रकरणाचे अवलोकन केले. वादी यांनी सदरचा दावा हा कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शणास येत आहे की, प्रतिवादी क्र. ३, ९, ११ व १२ यांना दाव्याच्या समन्सची बजावणी होऊन देखील ते न्यायालयात हजर न राहिल्याने त्यांच्याविरुध्द दिनांक १५/०६/२०२३ रोजी एकतर्फा आदेश पारीत करण्यात आला होता. प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिनांक २३/०३/२०२३ रोजी दाखल केलेला आहे.

०३. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी यांनी असे कारण नमुद केले आहे की, प्रतिवादी क्र.३ हे कर्नाटक राज्यातील गोटूर या गावी राहणेस असून प्रतिवादी क्र.९ हे वयोवृध्द असून वयोमानानुसार वरचेवर आजारी असतात. तसेच, प्रतिवादी क्र.११ व १२ या विवाहीत महिला असून त्या आपआपल्या सासरी राहणेस असतात. त्यामुळे, प्रतिवादी यांना वेळेत आपल्या वकीलांची भेट घेऊन माहिती देता आली नाही व वादीचे दावेस कैफियत व म्हणणे मुदतीत देता आले नाही असे कारण नमूद केले आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ९, नियम ७ प्रमाणे पुर्वीच्या अनुपस्थितीबद्दल प्रतिवादीने योग्य कारण देणे गरजेचे आहे. प्रत्यक्षात सदर कारण व प्रतिवादी हजर झाल्याचा काळ विचारात घेतले असता, सदर कारण संयुक्तीक वाटत नाही. परंतु, दाव्याचा गुण दोषावर न्यायनिर्णय करण्यासाठी प्रतिवादीविरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द करुन त्यांना दाव्यात हजर राहण्याची संधी देणे योग्य होईल. वर नमुद प्रमाणे प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज विलंबाने दाखल केलेला असल्याने प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र. ३, ९, ११ व १२ यांना प्रत्येकी रक्कम रु.१००/- अशी एकूण रक्कम रु.४००/- चे खर्चासह मंजूर करणे योग्य होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**-: आदेश :-**

०१. अर्ज रक्कम रु.४००/- (रुपये चारशे फक्त) च्या खर्चासह मंजुर करण्यात येतो.

०२. खर्चाची रक्कम प्रतिवादी यांनी पुढील तारखेपर्यंत वादी यांना अदा करावी.

०३. खर्चाची रक्कम वादींना दिल्यानंतर प्रतिवादी क्र. ३, ९, ११ व १२ यांचेविरुध्द पारित झालेला एकतर्फा आदेश रद्द करण्यात येतो.

सही/-

**( एस. ए. राठोड )**

गडहिंग्लज.
दिनांकः ०९/०१/२०२४.

सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
गडहिंग्लज.

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | R. D. Patil. |
| Name of Court | S. A. Rathod,<br>Jt. CJJD & JMFC, Gadhinglaj. |
| Date of Dictation | 09/01/2024 |
| Order signed by P.O. on | 09/01/2024 |
| Order uploaded on | 09/01/2024 |